महासागर
नागपूर
वृत्तसागर
■ मंगळवार, दि. ८, जुलै २०२५ ■

# समाज माध्यमावर महिलेची बदनामी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :

समाज माध्यमावर शिक्षिका आणि धर्मगुरूंबाबत आक्षेपार्ह आणि बदनामीकारक लिखाण केल्याप्रकरणी यशोधरानगर पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. रशीद हैदर मुसा हैदर, फैमिदा रशीद कांचवाला, डॉ. जोएब हैदर हुसेन आणि सारा जोएब हैदर सर्व रा. मेहंदीबाग कॉलनी, बिनाकी मंगळवारी अशी आरोपींची नावे आहेत.

पीडित 45 वर्षीय महिला कुटुंबासह यशोधरानगर पोलिस ठाण्यांतर्गत राहते आणि एका शाळेत शिक्षिका आहे. पीडित महिलेच्या तक्रारीनुसार, वरील आरोपींकडून त्यांच्याबाबत समाजाच्या व्हॉट्सअ‍ॅप ग्रूपवर आक्षेपार्ह लिखाण केले जात होते. शेजारी राहणाऱ्या महिलेकडून त्यांना याबाबत समजले. नंतर एका नातेवाईक महिलेनेही तिला अशाप्रकारचा संदेश मिळाल्याची माहिती दिली.

यामुळे पीडित महिला मानसिक आणि धार्मिकरित्या दुखावल्या गेली. त्यांनी खोटी अफवा पसरवणाऱ्याबाबत माहिती काढली असता वरील आरोपींनी ते संदेश आणि मेल प्रसारित केल्याचे पुढे आले. त्यांनी घटनेची पोलिसात तक्रार दाखल केली. पोलिसांनी प्रकरणाची गंभीरता लक्षात घेत चारही आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे. परिसरातील रहिवाशांनी पीडित महिलेच्या समर्थनात वरील चारही आरोपींवर कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# संततधार पावसाने शहरातील जनजीवन ठप्प

## शहरात अनेक सखल भागात पाणी, झाडांची पडझड, रस्त्यांवर पडले खड्डे

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :

विदर्भातील अनेक जिल्हासह रविवारी रात्री पासून सुरू झालेला पाऊस सर्वत्र सुरूच होता. पावसाने दमदार हजेरी लावली असून सतत धार पावसामुळे नागपुर शहरातील अनेक ठिकाणी पावसाचे पाणी साचलेले असून मोठ्या प्रमाणात झांडाची पडछड झाली आहे. चोवीस तासांपासून शहरासह ग्रामीण क्षेत्रात सर्वदूर संततधार पावसाने हजेरी लावली. कधी रिमझीम तर कधी जोराच्या पाऊसधारांमुळे शहरातील सखल भाग जलमय झाला.

सिमेंट रस्त्यांच्या आजुबाजुच्या अनेक वस्त्यांमध्ये पाणी साचल्याच्या तक्रारी ऐकायला मिळाल्या. अनेक भागात रस्त्यांवर झाडे पडल्याने वाहतूक विस्कळीत झाली. आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या चमुने रस्त्यांवरील झाडे कापल्याने पुन्हा वाहतूक सुरळीत होऊ शकली.संततधार पावसाने शहरातील जनजीवन ठप्प पडले होते. केवळ शाळकरी मुले आणि नोकरदार वर्ग सकाळी आणि सायंकाळी घराबाहेर पडल्याचे दिसून आले. सतत सुरू असलेल्या पावसाने कुठलीही हाणी झाली नाही. मात्र अनेक भागात झाडे उन्मळून पडल्याने काही भागात वाहतुकीची कोंडी झाली.

आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून प्राप्त माहितीनुसार संततधार पावसाच्या तडाख्यात गिट्टी खदान रोडवरील शीतला माता मंदिर छावनी येथे झाड पडल्याने तेथील वाहतूक विस्कळीत झाली. पंचशील चौकाजवळील जसलीन हॉस्पीटल समोरील झाड पडले. तर सिव्हील लाईन्स स्थित प्रशासकीय इमारत क्रमांक १ जवळील झाड पडल्याने काही काळ तेथील वाहनांच्या ये-जा करण्यावर परिणाम झाला. प्राप्त माहितीनुसार आकाशवाणी चौक,





वादळी पावसामुळे झाडे रस्त्यावर पडली सखल भागात पाणी साचल्याने वाहने अशी अडकली होती

तेलंखेडी रोड हनुमान मंदिर जवळील झाड पडले. तसेच शेतकरी भवन जवळील झाड पडले. आपत्ती व्यवस्थापन चमुने झाडे तोडून वाहतूक पूर्ववत केली. जाटतरोडी गल्ली क्रमांक २ येथे डेंटल हॉस्पीटलजवळ झाड पडले. आपत्ती व्यवस्थापन चमुने झाडाच्या फांद्या तोडून रस्ता मोकळा केला.

शहरातील सखल भागातील वस्त्यांमध्ये पाणी साचल्याच्या काही तक्रारी प्राप्त झाल्या. पाऊस संततधार असला तरी मुसळधार नसल्याने वाहतूक अथवा रहदारीवर कुठलाही अडथळा निर्माण झाला नाही. धंतोलीकडून घाटरोडकडे जाणाऱ्या रेल्वे पुलाखाली पाणी साचले. मात्र साचलेले पाणी वाहून जात असल्याने वाहतुकीवर फारसा परिणाम झाला नाही. इतवारीतील निकालस मंदिर चौकात पावसाचे पाणी साचल्याने वाहतुकीसह रहदारीचा खोळंबा झाल्याचे सुत्रांनी सांगितले. इतवारी, गांधीबाग, निकालस मंदिर परिसरात बाजारपेठा असल्याने वाहतूक विस्कळीत झाली.

शहरात ठिकठिकाणी रस्ते, नाल्या, केबल आदींसाठी खोदकाम झाले आहे. अनेक ठिकाणी काम पूर्ण होऊनही खोदकाम बुजविण्यात आलेले नाही. खोदकामाच्या ठिकाणी सुचना फलकही लावण्यात आलेले नाही. त्यामुळे पावसाचे पाणी खोदकामाच्या ठिकाणी आणि खड्डयांमध्ये साचल्याने अपघात होण्याची शक्यता वाढली आहे.

शहरात आणि शहर सिमेबाहेरील ले-आऊटमध्ये मोठ्या प्रमाणात खुले भूखंड आहेत. चोवीसतासांपासून सुरू असलेल्या पावसाचे पाणी या भूखंडांमध्ये साचल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात आल्या आहेत. संततधार पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. त्यामुळे नागरिकांनाही दिलासा मिळाला आहे.

# २ मजुरांवर कोसळली नाल्याची भिंत

## मलब्याखाली दबून महिलेचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :

साफ-सफाईदरम्यान अचानक नाल्याची भिंत कोसळल्याने दोन मजूर मलब्याखाली दबले. बऱ्याच प्रयत्नानंतर दोघांनाही बाहेर काढण्यात आले. गंभीर अवस्थेत त्यांना उपचारार्थ रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी महिला मजुराला मृत घोषित केले तर पुरूष मजुरावर उपचार सुरू आहेत. ही दुर्दैवी घटना नंदनवन पोलिस ठाण्यांतर्गत श्रीकृष्णनगर परिसरात घडली. श्रुती प्रकाश उके (30) रा. अजनी चौक असे मृत महिलेचे तर धानोलाल मारपा (50) असे जखमीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, श्रीकृष्णनगरच्या डीमार्टजवळ महानगर पालिकेकडून नाल्याची साफ-सफाई आणि सुरक्षा भिंतीचे बांधकाम करण्यात येत आहे. या कामाचे कंत्राट एका कंत्राटदाराला देण्यात आले आहे. रविवारी सायंकाळी कंत्राटदाराने 5 ते 6 मजुरांना कामावर लावले होते. सर्वप्रथम नाला स्वच्छ केला जाणार होता. श्रुती आणि धानोलाल इतर मजुरांसह नाल्याची साफ-सफाईचे काम करीत होते. या दरम्यान अचानक नाल्याची जुनी शिकस्त झालेली सुरक्षा भिंत कोसळली. भिंतीलगत काम करीत असल्याने श्रुती आणि धानोलाल भिंतीच्या मलब्याखाली दबल्या गेले. या घटनेने परिसरात खळबळ उडाली. सहकाऱ्यांनी मलबा हटवून दोघांनाही बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू केले. जवळच एक जेसीबी उभी होती. मलबा अधिक असल्याने जेसीबीची मदत घेण्यात आली. दोघांनाही बाहेर काढून तात्काळ उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांनी तपासून श्रुतीला मृत घोषित केले. धानोलाल यांच्यावर उपचार सुरू आहेत.

स्थानिक नागरिकांनुसार, नाल्यांची साफ-सफाई पावसाळ्यापूर्वीच झाली पाहिजे. मात्र वर्षभर कुंभकर्णी निद्रेत राहणाऱ्या महानगर पालिकेला ऐन पावसाळ्यात याची आठवण येते. नाल्याची भिंत शिकस्त असतानाही तेथे मजुरांच्या सुरक्षेशी संबंधित कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नव्हती. या घटनेसाठी केवळ आणि केवळ महानगर पालिकाच जबाबदार आहे. नंदनवनचे ठाणेदार विनायक कोळी यांनी सांगितले की, पोलिसांनी सध्या अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. तपासात या घटनेसाठी कोणी जबाबदार आढळला तर त्याच्यावर कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

# पिडीत दिव्यांग कुटुंबाला आमदार समीर मेघे यांची मदत



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :

हिंगणा तालुक्यातील इसासनी (वाघदरा )वार्ड क्रं ६येथील दिव्यांग नागरीक पंजाबराव खंडारे यांच्या घराला विद्युत उपकरणामध्ये बिघाड निर्माण झाल्याने आग लागली. या आगीत संसारोपयोगी वस्तू जळून खाक झाल्याने त्यांना आमदार समीर मेघे यांनी आर्थिक मदत केली.

दुपारची वेळ असल्याने घरी कोणी नसल्यामुळे आगीने रौद्ररूप धारण केले या घटनेची माहिती परीसरामधील नागरीकांनी ग्रामपंचायत सदस्य दादाराव मसराम यांना सांगितली त्यांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने टँकरच्या साह्याने आग आटोक्यात आणली. सुदैवाने जीवितहानी झाली नाही. आगीमध्ये संसार उपयोगी साहित्य व अन्न धान्य जळुन खाक झाले त्यामुळे पिडीत दिव्यांग नागरीकांच्या कुटुंबासमोर उपजिविकेचा मोठा प्रश्न निर्माण झाला.ग्रामपंचायत सदस्य दादाराव मसराम यांनी आमदार समीर मेघे यांच्या कडे पाठपुरावा करून पिडीत कुटुंबाला आर्थिक मदत करण्याची विनंती केली आमदार समीर मेघे यांनी स्थानिक जनप्रतिनिधी यांची विनंती मान्य करुन या कुटुंबाला भरीव आर्थिक मदत केली.

या प्रसंगी सरपंच अरविंद ढोणे, भाजप डिगडोह (देवी) शहराध्यक्ष कैलास गिरी, माजी सरपंच इंदुबाई चौधरी, ग्रामपंचायत सदस्य लहानु जिवतोडे, दादाराव मसराम, पिडीत दिव्यांग पंजाबराव खंडारे, निलेश खंडारे यांची विशेष उपस्थिती होती.

# जिल्ह्यात दोन दिवस मुसळधार पाऊस

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :

भारतीय हवामान खात्याने नागपूर जिल्ह्यामध्ये ७ जुलै ते ९ जुलै २०२५ या कालावधीमध्ये मुसळधार ते अति मुसळधार पाऊस, मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तवलेली आहे. दि. ७ व ८ जुलै २०२५ या कालावधी करिता ऑरेंज अलर्ट दिलेला असून ऑरेंज अलर्ट कालावधीमध्ये काही ठिकाणी अत्यंत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवलेली आहे.

या अनुषंगाने नागपूर जिल्ह्यातील नागरिकांनी आवश्यक काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. विज गर्जना होत असताना शक्यतो घरातच राहणे आवश्यक आहे. अशा कालावधीमध्ये मोबाईल फोन सोबत बाळगू नये. विज गर्जना सुरू असताना घरातील इलेक्ट्रिकल उपकरणे बंद ठेवावी. पाऊस व विज गर्जना होत असताना चुकूनही झाडाच्या खाली उभे राहू नये व शेतात काम करत असताना सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा.

नागरीकांनी जल पर्यटन स्थळी अती उत्साही होऊन जीव धोक्यात घालणारी कुठलीही कृती करू नये. शक्यतोवर पाण्यामध्ये उतरण्याचे धाडस करू नये.

नदी, नाले, दुथळी वाहत असतात तेव्हा पाणी पुलावरून किंवा रस्त्यावरून वाहत असते अशा वेळी चुकूनही तो पुल किंवा रस्ता चालत किंवा गाडी मधुन ओलांडण्याचा प्रयत्न करू नये. आवश्यक खबरदारी घेवून स्वतःची त्याचप्रमाणे आपल्या कुटूंबियांची व परिवाराची अशा ठिकाणी आवश्यक काळजी घ्यावी व प्रशासनकडून निर्गमित होत असलेल्या सुचनाचे पालन करून सहकार्य करावे.

जिल्ह्यातील समस्त नागरिकांना व शेतकऱ्यांनी शासनाच्या सर्व सूचनांचे पालन करावे व स्वसंरक्षणासाठी सतर्क राहावे, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नागपूर जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांनी केले आहे.

# शहरात चिमुकल्या चोरांची टोळी सक्रीय

## बेलतरोडी पोलिसांनी १० सायकली केल्या जप्त

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :

त्यांचे वय अवघे 7 ते 10 वर्षे आहे. या वयातील मुलांना खेळण्यापलिकडे दुसरे काहीच समजत नाही. मात्र खेळण्याच्या वयात त्यांनी टोळी तयार केली. शहरातील वेगवेगळ्या भागातून एक नव्हे तर तब्बल 10 सायकल चोरी केल्या. चोरीची सायकल विकून मिळालेल्या पैशांत मनसोक्त खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला. एवढ्या कमी वयाच्या लहान मुलांनी टोळी तयार करून मोठे कृत्य केल्याचे बहुदा हे देशातील पहिलेच प्रकरण असेल. फियार्दी आशिष उमाटे (40) रा. मनीषनगर, बेलतरोडी यांच्या मुलीची सायकल चोरी झाली. त्यांनी ठाण्यात तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीवरुन पोलिसांनी गुन्हा दाखल केला आणि तपासाला सुरूवात केली. एका 8 वर्षाच्या मुलाची आस्थेनी विचारपूस केली असता त्याने इतर मुलांची नावे सांगितली. पोलिसांनी चारही मुलांची विचारपूस केली असता हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ही चारही मुले 7 ते 10 वर्ष वयोगटातील आहेत. कोणाला आई आहे तर वडील नाही. कोणी आत्याकडे राहातो. चारही मुले शाळा शिकतात. मात्र, नेहमीच शाळेला दांडी मारतात. त्यांना चांगले खाद्य पदार्थ खाण्याची सवय लागली. त्यासाठी त्यांनी सायकल चोरी करण्यास सुरूवात केली. एक-एक करीत तब्बल 10 सायकल चोरी केल्या. विशेष म्हणजे 10 ते 20 हजार रुपये किंमतीच्या सायकली कवळीमोल भावात म्हणजे केवळ 500 रुपयांत ते विकत होते. वडिलांचे निधन झाले. घरी अन्नधान्य नाही, अशी थाप मारत असल्याने लोकही त्यांच्यावर दया दाखवून त्या सायकली खरेदी करीत होते. पाचशे रुपयात सहज खरेदी करता येते. शिवाय पोलिसात तक्रार देण्याच्या भानगडीत कोणी पडत नाही. तक्रार दिली तरी पोलिस फार लक्ष देत नाही, असा गैरसमज करुन त्यांनी सायकली चोरीचा सपाटा लावला होता. वरिष्ठ पोलिस निरीक्षक मुकुंद कवाडे यांनी प्रकरणाची गंभीर दखल घेतली. उपनिरीक्षक मनोज गभणे, पोलिस हवालदार कश्यप, कविता जांभुळकर यांनी मुलांचा शोध लावून 10 सायकली जप्त केल्या.

### बेलतरोडी ठाण्याशी संपर्क साधावा

पोलीस ठाणे बेलतरोडी येथे सायकल चोरीसंबंधी दाखल झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, बेलतरोडी पोलिस ठाण्याच्या डीबी पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे तपास करून विधी संघर्षग्रस्त बालकांचा शोध लावला असून त्यांच्याकडून 10 सायकली जप्त केल्या आहेत. त्याअनुषंगाने, शहरातील कोणत्याही ठाण्याच्या कार्यक्षेत्रात सायकल चोरीच्या तक्रारी दाखल असतील किंवा अशा प्रकरणांची चौकशी सुरू असेल, तर कृपया बेलतरोडी ठाण्याशी संपर्क साधावा, जेणेकरून जप्त सायकली आणि गुन्ह्याचा परस्पर संबंध तपासता येईल.

**मुकुंद कवाडे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक (बेलतरोडी)**

# सौंदर्यीकरणासह उड्डाणपुलाखाली बास्केटबॉल कोर्ट, ग्रीन जिम

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :

सुदृढ आरोग्य आणि तणावापासून दूर राहण्यासाठी विविध प्रकारचे खेळ खेळणे आवश्यक आहे. मोबाईलच्या आहारी गेलेल्या युवकांना पुन्हा मैदानी खेळांकडे वळण्यासाठी आणि युवकांना आऊटडोअर्स गेम्स खेळण्यासाठी प्रेरित करण्याकरिता नागपूर महानगरपालिकाद्वारे विविध उड्डाणपूलाखाली बास्केटबॉल कोर्ट, ग्रीन जिमची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे.

शहरातील विविध उड्डाणपुलाखाली असलेल्या खाली जागांना युवकांच्या आवडत्या खेळचे मैदान म्हणून विकसित करण्यात आले आहे. विशेषतः दिघोरी उड्डाणपुलाखाली बॉस्केटबॉल कोर्ट, स्केटिंग रिंग तयार करण्यात आले असून, नरेंद्रनगर उड्डाणपूला खाली देखील युवकांसाठी प्रशस्त असे क्रीडांगण तयार केले जात आहे. अशाचे प्रकारचे मैदान यापूर्वी इतर शहरांमध्ये बघायला मिळायचे पण, आता नागपुरातही याप्रकारचे मैदान तयार केले जात असल्याने नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.

शहरातील विविध भागांमध्ये सौंदर्यीकरण आणि सुशोभीकरण करण्यात आल्याने ओसाड पडलेल्या



जागांना नवसंजीवनी मिळाली आहे. मनपाद्वारे शहरात असलेल्या विविध उड्डणापुलाखाली लॅंडस्केपिंग आणि सौंदर्यीकरण करण्यात आल्याने शहराच्या वैभवात अधिक भर पडली आहे. नागरिकांनाही एक सुंदर आणि आल्हाददायक वातावरण मिळत आहे. स्वच्छ आणि सुंदर परिसर पाहून नागरिकांमध्येही सकारात्मकता वाढली आहे. नागपूर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निदेर्शानुसार शहरातील विविध भागांमध्ये सौंदर्यीकरण आणि सुशोभीकरण करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून, उड्डाणपुलाखाली असेल्या जागांचे लँडस्केपिंग आणि सौंदर्यीकरणाची कामे हाती घेण्यात आली आहे. जी 20 अंतर्गत शहरातील जयप्रकाशनगर मेट्रो स्टेशनच्या भिंत, दिघोरी, सक्करदरा, मेहंदीबाग आणि दहीबाजार उड्डाणपुलाखाली लँडस्केपिंग व सुशोभीकरण करण्यात आले आहे. या कामाचे लोकार्पण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. विविध उड्डाणपूलाखाली पूर्वी दुर्लक्षित असलेल्या जागा आता हिरवीगार झाडे, फुले आणि कलात्मकतेने सजल्या आहेत.

विशेष म्हणजे, जयप्रकाशनगर मेट्रो स्टेशनच्या भिंतीवर ग्राफीटी वर्क, महिलांच्या जीवनासह सायकलचे भित्तीचित्र तयार करण्यात आले आहे. मेट्रो स्टेशनची भिंत आकर्षक म्युरलमध्ये रुपांतरीत करण्यात आली आहे. नागपूरची टायगर कॅपिटल आणि संत्र्याचे शहर म्हणून ओळख दर्शविते. याशिवाय ठकळ रंग, वनस्पती आणि वन्यजीवाचे चित्रण देखील यावर रेखाटण्यात आले आहेत. वर्धा मार्गावर एक दृश्य लँडमार्क म्हणून आपली नवीन ओळख निर्माण केली आहे.

दिघोरी उड्डाणपुलाखाली लँडस्केपिंग व सुशोभीकरण करण्यात आले आहे. येथील अतिक्रण काढून, जागेच स्वच्छ आणि सुव्यवस्थित विकास करण्यात आला आहे. नागरिकांसाठी बसण्याची सोय, रुग्णालय येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकसाठी प्रतीक्षा क्षेत्र म्हणून विकसित करण्यात आले आहे. याशिवाय बॉस्केटबॉल कोर्ट तयार करण्यात आले आहे. शहरातील नागरिकांसाठी याठिकाणी स्केटिंग ट्रँक तयार करण्यात आले आहे.

शहरातील नरेंद्रनगर उड्डाणपूला खाली देखील युवकांसाठी प्रशस्त असे क्रीडांगण तयार केले जात आहे. याशिवाय सक्करदरा उड्डाणपुलाखालील भागाचा मनपाने विकास केला आहे. यामुळे शहराच्या सौंदर्यीकरणात अधिक भर पडली आहे. ठिकाणी बसण्याची प्रशस्त सुविधा असल्याने या ठिकाणी नागरिकांना शांततेत बसता येते. शिवाय हिरवळ आणि रंगीबेरंगी स्तंभकला तयार करून शहराच्या सौंदर्यीकरणात अधिक भर पडली आहे. इंद्रधनुष्य रंगातील एमएस छत्र्यांची आकर्षक स्थापना करण्यात आली आहे. मनपाद्वारे हे ठिकाण शहराच्या महत्त्वाच्या मार्गावरील आरामदायक विश्रांती पॉइंत तयार करण्यात आले आहे.

मेहंदीबाग उड्डाणपुलाखाली लँडस्केपिंग आणि सुशोभीकरणाचे काम करुन घनदाट वस्तीतील नागरिकांकरिता आनंदायी वातावरण निर्माण करण्याचे काम करण्यात आले आहे. उड्डाणपुलाच्या स्तंभाचा विकास झाडांसारखा करण्यात आला आहे. नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था, मुलं आणि वयोवृद्धाकरिता विश्रांती आणि करमणुकीसाठी बसण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

तर दही बाजार उड्डाणपूल हा गजबजलेल्या बाजार क्षेत्रात स्थित आहे. या उडाणपूलाखाली दुकानदार आणि ग्राहकांसाठी शांततामय विश्रांतीस्थान म्हणून विकसित करण्यात आले आहे. उडाणपूलांचे स्तंभाची झाडांसारखी रचना करण्यात आली असल्याने सौंदर्यात अधिक भर पडते. नागरिकांना शांततामय आनंद देखील मिळतो. महानगरपालिकेने केलेल्या या कामामुळे शहरातील विविध भागांमध्ये खऱ्या अर्थाने नवसंजीवनी मिळाली आहे.

# डॉ. प्रवीण डबली यांचा सत्कार




■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :

जेसीआय नागपूर शक्ती झोन ९ आणि रेड स्वस्तिक सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने राशी डेंटल क्लिनिक येथे डॉक्टर डे सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. ज्यामध्ये निसर्गोपचार आणि नियोग थेरपिस्ट डॉ. प्रवीण डबली यांना समाजसेवा, पत्रकारिता आणि रुग्णसेवेतील त्यांच्या अमूल्य योगदानाबद्दल रुग्णसेवेतील समर्पित ऑर्थोपेडिक तज्ज्ञ डॉ. अनिल गोल्हर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे सहआयुक्त संजय अग्रवाल, विशेष पाहुणे निवृत्त अतिरिक्त डीजीपी महाराष्ट्र पोलिस डॉ. टी. एस. भाल, विशेष पाहुणे सहाय्यक संचालक आयबी आशु कोटांगले, डॉ. मनोज तवानी, दंत तज्ज्ञ डॉ. राकेश डकाहा हे प्रमुख उपस्थित होते.


याप्रसंगी विविध विद्याशाखांमधील २१ डॉक्टरांचा सत्कार करण्यात आला. ज्यामध्ये डॉ. अंशुल चड्डा, डॉ. स्मिता पाखमोडे, डॉ. अलका जैन, डॉ. आनंद राज, डॉ. रावलीन कौर, डॉ. जॉयलीन कोरिया, डॉ. प्रवीण मिश्रा, डॉ. आलिया, डॉ. एस. श्रीवास्तव हे प्रमुख होते. सर्व पाहुण्यांनी आपल्या भाषणात समाजातील मानवतेसाठी समर्पित सेवकांचा सन्मान केला आणि त्यांच्या सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तसेच, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संजय अग्रवाल यांनी संपर्क आणि संवादाद्वारे एकमेकांच्या सुख-दुःखात सामील होऊन समाजाला एक नवीन दिशा देण्यावर भर दिला. त्याच वेळी, डॉ. टी. एस. भाल यांनी डॉक्टरांना समाजसेवेसाठी घेतलेल्या शपथेचे पालन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे विशेष पाहुणे डॉ. अनिल गोल्हर यांनी रुग्णसेवेसाठी समर्पण करण्याचा आणि सर्वांना काही खास कलांची जाणीव करून देण्याचा आणि त्याचा फायदा समाजाला देण्याचा संदेश दिला.

# उघडे वीज रोहित्र देत आहे अपघाताला आमंत्रण....

■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. ७ :

शहरासह तालुक्यातील अनेक भागात असलेले विजेचे रोहित्र उघडे असल्यामुळे मोकाट जनावरांसह नागरिकांच्या जिवास धोका निर्माण झाला आहे. या गंभीर बाबीकडे वीज कंपनीचे अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते.

महावितरणच्या मुख्य केंद्रातून येणारा वीजप्रवाह अतिउच्च दाबाचा असतो. तो थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवला जात नाही. ग्राहक आणि उच्च दाब यांच्यातील मुख्य दुवा म्हणजे रोहित्र. या रोहित्रांची योग्य देखरेखीचे काम 'महावितरण'कडे असते; परंतु याकडे दुर्लक्ष होत आहे.



शहरासह तालुक्यातील बहुतांश रोहित्र रस्त्याच्या बाजूलाच आहेत. अनेक रोहित्रांचे गेट लावलेच नाही. पावसाळ्यापूर्वी वीज वितरण कंपनीकडून शहरासह ग्रामीण भागात झाडाच्या फांद्या वीज ताराला अडचण ठरत असल्याने कापल्या आहे. त्याचबरोबर वीज तारसुद्धा व्यवस्थित केले आहे. काही प्रमाणात वीज रोहित्रांचे दरवाजे बंद केले होतेः परंतु काही महिन्यातच परिस्थिती जैसे थे झाली. ग्रामीण भागातील मुख्य वर्दळीच्या ठिकाणावरील विजेचे रोहित्रांच्या पट्ट्या उघड्या आहेत.

रोहित्र जमिनीपासून अगदी काही फुटावर बसविण्यात आले असल्याने वत्या ठिकाणी गुरेढोरे तसेच प्लस्टिक लोखंड वेचणारे गरीब मुले व नागरिक त्या जवळ जात असल्याने व यात जिवंत वीजतारा असल्याने एखादेवेळी अनुचित घटना घडू शकते.

कित्येक ठिकाणी बसविलेल्या रोहित्रांसमोर धोका फलकही लावण्यात आले नाहीत. रस्त्यावरील वीज खांबालगत धोकादायक वायरिंग, उघड्या डीपी, तसेच पथदिव्यांच्या खांबावर सर्रासपणे जाहिरातींच्या होर्डिंग लावण्यात आल्याचेही दिसून येते.

रोहित्रांना दरवाजा लावणे, देखभाल, दुरुस्तीची जबाबदारी वीज कंपनीवर आहे; मात्र, याविषयी कुठलेही गांभीर्य दिसत नसून, डेंजर झोन ठरणारी रोहित्रांची स्थिती तालुक्यातील बोरगांव येथे रस्त्याच्या कडेला असलेल्या ठिकाणी भयानक आहे. वीज रोहित्रांवर 'डेंजर' (धोका) असे लिहिलेले असणे आवश्यक आहे. दरवाजा बंद करून त्यावर धोक्याची सचित्र सूचना देणेसुद्धा गरजेचे आहे; परंतु यातील दरवाजेच उघडे असल्याने हे रोहित्र अपघातांना आमंत्रण देऊ शकते.

त्याचबरोबर रोहित्रांवरील सूचनांची पूर्णतः वाट लागली आहे. अनेक ठिकाणच्या रोहित्रांवर विविध प्रकारच्या जाहिरातीचे फलक चिकटविण्यात येतात. रस्त्यावरील रोहित्राजवळ परिसरातील कोणीही किरकोळ सामान ठेवू शकतो. एवढेच नव्हे तर रोहित्राजवळ नकळत वाहन लावणे, गुरे फिरणे तसेच नागरिकांचा वावर असे प्रकार सर्रास दिसतात.

रस्त्याच्या कडेला मुलं खेळत असतात. गवत, वेलांचा विळखा वाढत आहे. अशा स्थितीत शहरातील हे धोकादायक रोहित्रे असून याची व्यवस्थित तपासणी करून तालुक्यातील काही भागातील रोहित्रांचे दरवाजे पूर्णतः बंद करण्याची मागणी नागरिक करीत आहे.

### दुरुस्तीसाठी टाळाटाळ....!!!!!

तालुक्यातील शहरासह ग्रामीण भागातील अनेकवेळा डीपीचे झाकण लावण्याचे कष्ट कर्मचारी घेत नाहीत तर काही ठिकाणी डीपीचे झाकण तुटले अथवा नादुरुस्त असल्यास ते पुन्हा योग्य करण्याची जबाबदारी महावितरणची आहे. असे असताना तालुक्यातील बोरगांव येथे मुख्य रस्त्याच्या कडेला असलेल्या भागात ट्रान्सफॉर्मरच्या खाली उभारण्यात आलेल्या डीपी कधी सुरळीत होणार, जीवितहानी झाल्यानंतर महावितरण जागे होणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. बोरगांवच्या मुख्य रस्ता लगत असलेल्या डीपी ला झाकण नसल्यामुळे मोठा धोका होऊ शकतो त्यामुळे दुरुस्तीसाठी तात्काळ महावितरण कंपनीने पुढाकार घेऊन झाकण लावावे अशी मागणी जनतेमधून केली आहे

### अपघात झाल्यास जबाबदार कोण?

संबंधित यंत्रणांनी तत्काळ लक्ष देत या डीपीज सुरक्षित करण्याचे काम हाती घ्यावे, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा एखादा गंभीर अपघात घडल्यानंतर जबाबदारी कुणाची, असा सवाल उपस्थित केला जात आहे. तालुक्यातील शहरासह ग्रामीण भागातील अनेकवेळा डीपीचे झाकण लावण्याचे कष्ट कर्मचारी घेत नाहीत तर काही ठिकाणी डीपीचे झाकण तुटले अथवा नादुरुस्त असल्यास ते पुन्हा योग्य करण्याची जबाबदारी महावितरणची आहे. असे असताना तालुक्यातील बोरगांव येथे मुख्य रस्त्याच्या कडेला असलेल्या भागात ट्रान्सफॉर्मरच्या खाली उभारण्यात आलेल्या डीपी कधी सुरळीत होणार, जीवितहानी झाल्यानंतर महावितरण जागे होणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. बोरगांवच्या मुख्य रस्ता लगत असलेल्या डीपी ला झाकण नसल्यामुळे मोठा धोका होऊ शकतो त्यामुळे दुरुस्तीसाठी तात्काळ महावितरण कंपनीने पुढाकार घेऊन झाकण लावावे अशी मागणी जनतेमधून केली आहे.

# उपसरपंचाच्या घरी चोरी
## ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. ७ :



कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत खंडाळा घटाटे गावात कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी उपसरपंच चेतन कुंभलकर यांचा घराचे कुलुप तोडुन ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेल्याने पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शुक्रवार (दि.४) जुलै रोजी खंडाळा घटाटे ग्रामपंचायत उपसरपंच चेतन कुंभलकर यांचे वडील रमेश चैतराम कुंभलकर (६३) रा.खंडाळा घटाटे आणि त्यांची पत्नी शेतात गेले होते . चेतन कुंभलकर घराला कुलुप लाऊन ग्रामपंचायत आणि मौदा पोलीस स्टेशन येथे कामानिमित्य गेला होता. रमेश कुंभलकर सायंकाळी घरी आले, तेव्हा त्यांना घरचा दरवाजा उघडा दिसला. घरात जाऊन पाहणी केली असता बेडरुम मधील लोखंडी आलमारी आणि लॉकर उघडे दिसले व सर्व सामान खाली पडुन होते. आलमारी मध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने १८,००० रु, चांदिचे दागिने ३००० रुपए आणि नगदी ५०,००० रुपए असा एकुण ७१,००० रुपयांचा मुद्देमाल मिळुन आला नाही. कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी घराच्या मुख्य दरवाज्याचे कुलुप तोडुन आत प्रवेश करुन मुद्देमाल चोरुन नेल्याने कन्हान पोलीसांनी रमेश कुंभलकर यांचा तक्रारी वरून अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास पोलीस निरीक्षक वैजयंती मांडवधरे यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस करीत आहे .

**चोरटे सीसीटीवी कैमऱ्यात कैद**

सदर घटना सीसीटीवी कैमरात कैद झाली आहे, घरात प्रवेश करते वेळी आणि पळुन जातांनी चोरटे सीसीटीवी कैमऱ्यात कैद झाले आहे.

# वाडी परिसरातील समस्या सोडवा
## भाजपा वाडी मंडळाचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ७ :

वाडी परिसरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्या त्वरीत सोडवा अशा आशयाचे निवेदन भाजपा वाडी मंडळातर्फे वाडी नगर परिषदच्या मुख्याधिकारी डॉ.ऋचा धाबर्डे यांना सोमवार ७ जुलै रोजी देण्यात आले.




पावसाळ्यामुळे साचणारे पाणी, मोकळ्या जागेतील वाढलेली गवत-वनस्पती व त्यामुळे निर्माण होणारे डास हे मलेरिया व इतर जिवघेण्या आजारांना आमंत्रण देतात. त्यामुळे वाडीत त्वरित कीटकनाशक फवारणी करावी व आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात, परिसरात वाढत्या चोरीच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी चौका-चौकात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, वाडीतील सार्वजनिक शौचालयांची दुरवस्था, साफसफाईचा अभाव आणि लाईटची व्यवस्था नसल्याने नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. यावर त्वरित कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली.

या निवेदनावर मुख्याधिकारी डॉ. ऋचा धाबर्डे यांनी आठवड्याभरात आवश्यक ती कामे पूर्ण केली जातील, असे मौखिक आश्वासन दिले.

यावेळी माजी उपसरपंच आनंदबाबू कदम, भाजपा वाडी मंडळ अध्यक्ष कैलाश मंथापुरवार, माजी नगरसेवक दिनेश कोचे, ईशांत राऊत, विशाल डोंगरे, दत्ता बाबर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# विठ्ठल रुक्माई देवस्थान येथे प्रभात फेरी व पालखीची मिरवणूक



■ महासागर प्रतिनिधी
वानाडोंगरी, दि. ७ :

जयस्वाल लेआउट प्रभाग क्रमांक आठ विठ्ठल रुक्माई देवस्थान येथे मोठ्या प्रमाणात प्रभात फेरी व पालखीची मिरवणूक काढण्यात आली मोठ्या संख्येने भावी भक्त प्रभात फेरीकरिता उपस्थित राहून पालखी जयस्वाल लेआउट ते लडी लेआउट येते फिरवण्यात आली. नंतर बाळासाहेब टेकाडे महाराज यांचे कीर्तन झाले याप्रसंगी प्रामुख्याने उपस्थित नगरपरिषद वानाडोंगरीच्या पहिल्या नगराध्यक्ष वर्षा शाहाकर व माजी सरपंच सतीश शाहाकार प्रामुख्याने उपस्थित होते.

कमिटीचे अध्यक्ष शशिकांत लांडगे मंगेश पवार शिल्पा बावनथडे स्वाती रामटेके सुनील जाधव विकास धोटे विठ्ठल जोशी मनीषा राऊत शेख बहादूर सिंग शेकडो गावकरी मंडई पालखी करिता उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

# खडाळझरी व आजुबाजूच्या परिसरातील शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्यासाठी बैठक

■ महासागर प्रतिनिधी
भिवापूर, दि. ७ :

तालुक्यातील खडाळझरी आणि त्याच्या आजूबाजूच्या परिसरातील शेतकऱ्यांना खाण क्षेत्रातील दैनंदिन उत्पादन आणि उत्खनन कायार्मुळे होणाऱ्या अडचणी टाळण्यासाठी, अध्यक्ष, सह प्रबंधक आणि संचालक यांना एक निवेदन देण्यात आले होते की ज्याप्रमाणे पिरावा या गावाचे पुनर्वसन करण्यात आले त्याच धर्तीवर जरी वेकोलीच्या मापदंडामध्ये जरी बसत नसेल तरी यासाठी आंदोलन जरी करायचे झाल्यास आंदोलन करू पण खंडाळझरी या गावातील १४५ कुटुंबाना न्याय मिळवून देऊ याकरिता निवेदनाची दखल घेत आज ५ जुलै शनिवारला दुपारी तीन वाजता माजी आमदार राजू पारवे यांच्या उपस्थितीत खंडाळझरी या गावात तातडीने बैठक घेण्यात आली. या बैठकीत गावकऱ्यांशी थेट संवाद साधण्यात आला यासंदर्भात प्रशासनाकडून सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन यावेळी देण्यात आले. या बैठकीस वेकोलीचे मुख्य महाप्रबंधक मोहम्मद साबीर, दीपकजी वालके, मोहन कृष्णा, योगेश कतोरिया, मनोज नवले, राहुल मसराम, पोपेश्वर गिरडकर, रविंद्र राऊत, किरण वरघणे आदी उपस्थित होते.



# मिनी ट्रॅक्टर योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ७ :

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना ९० टक्के अनुदानावर ९ ते १८ अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करण्याची योजना सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येते. अटी व शर्तीप्रमाणे मिनी ट्रॅक्टर योजनेसाठी पात्र ठरलेल्या बचत गटांना वाटप करण्यात येणार आहे.

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटातील सदस्य हे महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावेत. स्वयंसहाय्यता बचत गटातील किमान ८० टक्के सदस्य हे अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील असावेत. मिनी व त्याची उपसाधने यांच्या खरेदीची कमाल मयार्दा ३.५० लाख रुपये इतकी राहील. स्वयंसहायता बचत गटांनी वरील कमाल मयार्देच्या रक्कमेच्या १० टक्के स्वहिस्सा भरल्यानंतर ९० टक्के (कमाल ३.१५ लाख रुपये) शासकीय अनुदान अनुज्ञेय राहील.

सन २०२५-२६ या आर्थिक वषार्तील बचत गटांची निवड केल्यानंतर लाभार्थी बचत गटाने किमान ९ ते १८ अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांची खरेदी करावी. परंतु जे लाभार्थी बचत गट मंजूर अनुदानाव्यतिरिक्त अधिक अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांची खरेदी करु इच्छित असतील, अशा पात्र ठरलेल्या बचत गटांना ते खरेदी करता येतील. या योजनेअंतर्गत स्वयंसहाय्यता बचत गटांना त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढावे या हेतूने त्यांना देण्यात आलेला मिनी ट्रॅक्टर इतर शेतकऱ्यांना भाडेतत्वावर देऊ शकेल. मात्र कोणत्याही परिस्थितीत त्याला मिनी टॅक्ट्रर विकता येणार नाही अथवा सावकार किंवा अन्य व्यक्तीकडे गहाण ठेवता येणार नाही.ज्या लाभार्थ्यांना पावर टिलरचा लाभ दिला आहे त्या लाभार्थीना या योजनेचा पुन्हा लाभ घेता येणार नाही. सन २०१४-१५ ते २४-२५ मध्ये ज्या बचत गटांना मिनी ट्रॅक्टरचे वाटप करण्यात आलेले आहे त्यांना सन २०२५-२६ करीता अर्ज करता येणार नाही.

अटी व शर्तीची पूर्तता करीत असलेल्या नागपूर जिल्हयातील इच्छूक स्वयंसहाय्यता बचत गटांनी प्रत्यक्ष या कार्यालयात येवून अर्ज घेवून जावे व तसा परिपूर्ण अर्ज भरुन विनाविलंब ३० जून रोजी पर्यंतच्या कालावधीत कार्यालयीन वेळेत वरील पत्यावर अर्जात नमुद केलेल्या पूर्ण कागदपत्राप्रमाणे पाठवावा. संबंधित बचत गटांनी अर्ज करण्याचे आवाहन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, नागपूर यांनी केले आहे.

# कल्याण मित्र बुद्ध विहार येथे महापुरुषांवर परीक्षा



■ महासागर प्रतिनिधी,रामटेक, दि. ७ :

दि.६ जुलै ला ला दुपारी १.०० वा. कल्याण मित्र बुद्ध विहार शितलवाडी रामटेक येथे परिवर्तन मंच रामटेक च्या अंतर्गत महापुरुषांना समजू या, चला जीवन घडवू या, या सदराखाली लेखी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत २० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. त्यामध्ये समता सैनिक दल, रामटेक शाखेच्या प्रमुख आयु. वैशाली वाघमारे तसेच समता सैनिक दलाचे सैनिक या सर्वांनी या परिक्षेत भाग घेऊन परीक्षा यशस्वी करण्यासाठी मोठे योगदान दिले. त्यांचे आयोजकांकडून आभार मानण्यात आले.

### बनावट उत्पन्नाचा दाखला दिल्यास मिळणार नाही मदत

**नागपूर :** मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, हैद्राबाद हाउस येथील कक्षामार्फत गरजु व पात्र रुग्णांना वैद्यकीय उपचाराकरीता अर्थसहाय्य अदा करण्याचे महत्वपूर्ण कामे केल्या जातात. यात रुग्णाच्या अजासोबत जोडण्यात येत असलेले उत्पनाचे प्रमाणपत्र जर बनावट आढळून आल्यास अशा रुग्णांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीमधुन अर्थसहाय्य अनुज्ञेय राहणार नाही असे प्रसिद्धीपत्रकान्वये सांगण्यात आले आहे. उत्पन्नाचे प्रमाणपत्र आपले सरकार सेवा केंद्रामधुन अधिकृतरीत्या तयार करण्यात आले पाहिजे. कोणत्याही दलालामार्फत अथवा एजंटमार्फत प्रमाणपत्र तयार करु नये.

# विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आषाढी एकादशी साजरी

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान , दि. ७ :

कन्हान शहरातील शिवाजी शगर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आषाढी एकादशी विविध कार्यक्रमाने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. श्री विठ्ठल रुक्मिणीचे जलाभिषेक करुन विधिवत महापुजा, काकड आरती करण्यात आली. महिलांचे परायण आणि विठ्ठल रुक्मिणी महिला भजन मंडळ शिवाजी नगर द्वारे भजन कीर्तन करण्यात आले. ह.भ.प श्रीकांत भुताळ यांचा मधुर अभंगवानीचा कार्यक्रम झाला. प्रसाद, फराळ वितरण करुन आषाढी एकादशी साजरी करण्यात आली.



**लहान हनुमान मंदिर, कांद्री**

कांद्री वार्ड क्रमांक २ येथील लहान हनुमान मंदिरात आषाढी एकादशी निमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. दिवसभर परिसरातील नागरिकांनी, महिलांनी विठ्ठल रुक्मिणीची पूजा अर्चना केली. श्री संत गजानन महाराज भजन मंडळ कांद्री यांचा भजन कीर्तन करुन आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी रमेश हजारे, फजित बावणे, राजेश पोटभरे, ज्ञानेश्वर गिऱ्हे, शिवाजी चकोले, रोहित चकोले, सौम्या वाढीभस्मे आदि उपस्थित होते.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ३२ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ७ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. सोमवार (ता.7) रोजी शोध पथकाने 32 प्रकरणांची नोंद करून 21,200/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु.



400/- दंड) या अंतर्गत 17 प्रकरणांची नोंद करून 6,800/- रुपयांची वसुली करण्यात आली.व्यक्तीने रस्ता,फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रू.100/-) या अंतर्गत 04 प्रकरणांची नोंद करून 400/- चे दंड वसुल करण्यात आले. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रू.400/-दंड) या अंतर्गत 05 प्रकरणांची नोंद करून 2,000/- रूपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 10 प्रकरणांची नोंद करून 7,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. बांधकामाचा कचरा सार्वजनिकरस्ता,फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी टाकणे या अंतर्गत 01 प्रकरणांची नोंद करून रू.1,000/-ची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 10 प्रकरणांची नोंद करून 2,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 02 प्रकरणांची नोंद करून रु.2,000/- चे दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत मे. मंजुषा ॲफिनिटी यांच्यावर रस्त्यालगत सी ॲंड डी कचरा टाकल्याबद्दल रु. 5,000/- चे दंड वसूल करण्यात आले.

# सेवासदन हायस्कूल तर्फे वारी संपन्न



**नागपूरः** सेवासदन हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीचे औचित्य साधून शालेय परिसरात विठ्ठल वारीचे आयोजन केले. विठ्ठल वारीच्या निमित्ताने सेवासदन हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रामुख्याने यामध्ये मंगलवेष तथा नऊवारी परिधान करून विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांची भूमिका साकारली.

वारीच्या माध्यमातून हजारो लाखो लोक एकत्र येऊन उत्साहाच्या वातावरणात ज्याप्रमाणे एकता, समानता, निर्मळता अशा अनेक मूल्यांचे प्रदर्शन करतात ते विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचा प्रयत्न करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी घोष, टाळ मृदंग, भगवे ध्वज, पर्यावरण संवर्धनाची फलके इत्यादीच्या माध्यमातून वारीचे दृश्य साकारले... संपूर्ण परिसर.. ज्ञानेश्वर माऊली तुकाराम........ पंढरीनाथ महाराज की जय....... अशा जयघोषाने दुमदुमले.. प्रसंगी विद्यार्थ्यांनी संवादातून वारीचे महत्त्व तसेच अभंग गायन केले.

# आम्ही भारताला धर्मशाळा बनू देणार नाही : ॲड. आकाश सपेलकर

■ महासागर प्रतिनिधी,
कामठी, दि. ७ :

भारतात राहणाऱ्या बेकायदेशीर घुसखोरांबद्दल सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा महत्त्वाचे भाष्य केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने एक कडक टिप्पणी केली आहे की भारत ही धर्मशाळा नाही जिथे आपण सर्वत्रून परदेशी नागरिकांचे स्वागत करू शकतो. आपण १४० कोटी लोकांसोबत लढत आहोत. न्यायालयाने राष्ट्रीय सुरक्षेला आणि मर्यादित संसाधनांना प्राधान्य देऊन बेकायदेशीर घुसखोरांना हद्दपार करण्यावरही भर दिला. कडक भूमिका घेत, सर्वोच्च न्यायालयाने श्रीलंकेच्या एका नागरिकाची आश्रय याचिका फेटाळली. श्रीलंकेच्या नागरिकाने आपल्या देशात आपल्या जीवाला धोका असल्याचे कारण देत भारतात आश्रय मागितला होता. श्रीलंकेचा नागरिक व्हिसावर भारतात आला होता आणि बेकायदेशीर कारवाया (प्रतिबंध) कायद्याअंतर्गत तो 3 वर्षांपासून तुरुंगात आहे. न्यायालयाचा हा निर्णय काही दिवसांपूर्वी रोहिंग्यांबाबत दाखल केलेल्या याचिकांवर दिलेल्या निर्णयाच्या धर्तीवर आहे.



भारतात निर्वासितांच्या आगमनाचा इतिहास नवीन नाही. १२०० वर्षांपूर्वी, पर्शियातील धार्मिक छळ आणि कट्टरतेमुळे, पारशी समुदायाचे लोक गुजरातमध्ये आले, तेव्हा राजा जदिराना यांनी त्यांना आश्रय दिला. पारशी समुदाय भारतात मीठ पाण्यात विरघळते तसे राहत आहे आणि तेव्हापासून ते येथे आदराने राहत आहेत. भारत नेहमीच दयाळू राहिला आहे पण आता बेकायदेशीर घुसखोर राष्ट्रीय सुरक्षेसाठी धोका बनले आहेत. स्वातंत्र्यापूर्वी आणि नंतर सुमारे २ कोटी लोक भारतात आले. बांगलादेशच्या स्वातंत्र्यापूर्वी सुमारे १ कोटी बांगलादेशी निर्वासित भारतात आले होते. ईशान्येकडील राज्यांमध्ये सुमारे ५३ हजार चकमा आले आहेत. ईशान्येकडील राज्यांमध्ये बेकायदेशीर बांगलादेशी घुसखोरांची समस्या गंभीर बनली आहे.

हे बेकायदेशीर स्थलांतरित भारताच्या अर्थव्यवस्थेला, राजकारणाला, समाजाला आणि सुरक्षेला गंभीर धोका निर्माण करत आहेत. ते केवळ सीमावर्ती भागातच स्थायिक झाले नाहीत तर ईशान्येकडील राज्ये, दिल्ली, मुंबई आणि बेंगळुरूसह देशातील जवळजवळ प्रत्येक राज्यात पोहोचले आहेत. सिलिगुडी कॉरिडॉरमध्ये अशा लोकांना वसवणे हे देशाच्या सुरक्षेसाठी चांगले नाही, विशेषतः जेव्हा बांगलादेश चीन-पाकिस्तानच्या जवळ येत आहे, जिथे शेख हसीना यांना हटवल्यानंतर कट्टरपंथीयांचे मनोबल वाढले आहे. २००० च्या अहवालानुसार, देशातील २५ लोकसभा जागांवर आणि १२० विधानसभा जागांवर बांगलादेशी घुसखोरांची प्रभावशाली भूमिका आहे. अहवालात म्हटले आहे की २००३ पर्यंत दिल्लीतील ६ लाख बांगलादेशी घुसखोरांनी भारतीय ओळखपत्रे मिळवली होती. देशातील इतर अनेक मतदारसंघांमध्येही जवळजवळ अशीच परिस्थिती असू शकते. असा अंदाज आहे की सध्या भारतात ३ ते ५ कोटी बेकायदेशीर बांगलादेशी घुसखोर राहत आहेत. त्यापैकी काही चुकीच्या कामांमध्ये सक्रिय असू शकतात.

संपूर्ण भारताला माहित आहे की बेकायदेशीर घुसखोरीमुळे आसाम आणि पश्चिम बंगालची लोकसंख्या बदलली आहे. अनेक भागात आदिवासी लोक अल्पसंख्याक बनले आहेत. निर्वासित आणि स्थलांतरित लोकसंख्येतील वाढीमुळे त्रिपुरासारख्या राज्यांमधील स्थानिक लोकसंख्या त्यांच्याच भूमीत अल्पसंख्याक बनली आहे, ज्यामुळे भूतकाळात बंडखोरीच्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

# पादचाऱ्यांकरिता अजनी चौक ते रहाटे कॉलनी चौक रस्ता सर्वोत्कृष्ट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

नागपूर शहरातील रस्त्यांची काही प्रमाणात सुधारणा करण्याची आवश्यकता असून, वाहनांच्या वेगावर नियंत्रण आणण्याची गरज असल्याचे नागपूर महानगरपालिका व आयटीडीपीने (इन्स्टिट्यूट फॉर ट्रांसपोर्टेशन अँड डेव्हलपमेंट पॉलीसी) सादर केलेल्या अहवालातून स्पष्ट झाले आहे. अहवालानुसार, पायी चालणाऱ्यांसाठी अजनी चौक ते रहाटे चौक पर्यंतचा रस्ता सुरक्षित व सर्वोत्कृष्ट असल्याचे निष्पन्न झाले आहे.

नागपूर महानगरपालिका आणि आयटीडीपी इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने ७ जुलै २०२५ रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या 'नागपूर अर्बन स्ट्रीट्स असेसमेंट रिपोर्ट' मध्ये शहरातील पायी चालण्यास व सायकलसाठी योग्य रस्त्यांची परिस्थिती व उपयुक्ततेचे सखोल मूल्यांकन करण्यात आले आहे. हा अहवाल दोन भागांमध्ये विभागलेला आहे. पहिल्या भागात आधीच पुनर्रचित रस्त्यांचे मूल्यांकन व दुसऱ्या भागात विद्यमान रस्त्यांची स्थितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. या अहवालात सर्वांसाठी समावेशक व योग्य शहरी वातावरण तयार करण्यासाठी धोरणात्मक शिफारसी करण्यात आल्या आहेत.





मूल्यांकनासाठी एकूण १० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची निवड करण्यात आली होती. यात अजनी चौक ते रहाटे कॉलनी, ऑरेंज सिटी स्ट्रीट, अमरावती रोड, सेंट्रल बाजार, शंकरनगर व रिंग रोडचा समावेश आहे. या सर्वेक्षणासाठी त्रिसूत्री पद्धती वापरण्यात आलेली आहे. यात डिझाईन सर्वे, निरीक्षण सर्वे व नागरिकांचे मत नोंदविण्यात आले आहेत. हा संपूर्ण सर्वेक्षण मार्च २०२४ ते सप्टेंबर २०२४ या काळात करण्यात आलेला आहे.

**दिशा दर्शविणारा अहवाल**

ही फक्त आकडेवारी नाही, तर दिशा दर्शवणारा अहवाल आहे. उदाहरणार्थ, वर्धा रोडवरील ८० टक्के लोकांनी सुधारणा झाल्यानंतर रस्ता अधिक सुरक्षित वाटत असल्याचे सांगितले. हीच लोकाभिमुख रचना म्हणजे खरी यशोगाथा असल्याची प्रतिक्रिया आयटीडीपी इंडीयाचे प्रोग्राम मॅनेजर प्रांजल कुलकर्णी यांनी व्यक्त केली.

**सर्वेक्षणातील महत्त्वाचे निष्कर्ष:**

सर्वाधिक गुण मिळवलेला सुधारित रस्ता - वर्धा रोड (अजनी चौक ते रहाटे कॉलनी चौक), एकूण 1.3 किमी लांबीचा हा भाग सर्व निकषांमध्ये - डिझाईन, निरीक्षण, आणि नागरिकांच्या अनुभवानुसार - सर्वोत्तम ठरला.

८० टक्के पेक्षा जास्त नागरिकांनी चालणे, सायकल चालवणे आणि सुरक्षा या बाबतीत सुधारणा झाल्याचे सांगितले. सावली, वेगळ्या एनएमटी झोन्सची रचना, बसण्यासाठी जागा, आणि सुरक्षित चौक यामुळे चांगला प्रतिसाद मिळाला. निरीक्षणात दिसून आले की 100 टक्के पादचाऱ्यांनी फुटपाथचाच वापर केला. काही भागांमध्ये फुटपाथवर वाहनं उभी करणं आणि सायकल मार्गाची कमतरता ही समस्या होती.

**सुरक्षित व सर्वसमावेशक रस्ते करू - वसुमना पंत**

या अभ्यासामुळे आपल्याला कुठे सुधारणा करावी लागेल हे स्पष्टपणे कळते. आम्ही या शिफारशी शहरपातळीवर लागू करून, सुरक्षित व सर्वसमावेशक रस्ते तयार करू, असे मत मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांनी व्यक्त केले.

**सुधारणेची गरज असलेले रस्ते**

सेंट्रल बाजार रोड (लोकमत चौक ते बजाजनगर चौक), रिंग रोड. या दोन्ही रस्त्यांना कमी गुण मिळाले, कारण फुटपाथमध्ये खंड, अतिक्रमण आणि सुरक्षिततेचा अभाव होता. रिंग रोडवर 90 टक्के लोक वाहतूक चालू असतानाही रस्त्याच्या कडेला चालताना दिसले. सायकल मार्ग नसतानाही, रिंग रोडवर ताशी 160 सायकलस्वार दिसले. यातून सायकल मार्गाची तातडीची गरज दर्शवते.

**अजनी ते रहाटे कॉलनी चौक सर्वोत्कृष्ट**

या सर्वेक्षणानंतर दिलेल्या मानांकनामध्ये अजनी चौक ते रहाटे कॉलनी चौक सर्वाधिक गुण घेऊन अव्वल आला आहे. यात रस्त्यांवर पादचाऱ्यानी फूटपाथ वापरणे, सायकलस्वारांसाठी हा रस्ता सर्वाधिक सुरक्षित असल्याचे या निष्कर्षातुन दिसून आले. वाहतुकीच्या दृष्टीने सेन्ट्रल बाजार रोड व रिंग रोड हा सर्वाधिक कमी गुण मिळविणारा ठरला आहे, रिंग रोडवर, वाहनांचा वेग, पदचाऱ्यांसाठी जागा तसेच फूटपाथचा योग्य वापर होत नसल्याचे दिसून आले आहे.

**वेगमर्यादेचे उल्लंघन:**

स्पीड गनने घेतलेल्या सर्वेक्षणात बहुतेक रस्त्यांवर वाहनांचे वेग ६० किमी प्रति तास पेक्षा जास्त नोंदवले गेले. ऑरेंज सिटी रोड आणि अमरावती रोड वर दुचाकींचा वेग ७५ किमी प्रति तास पर्यंत गेल्याचे निदर्शनात आले आहे. हे वेग राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सुरक्षित रस्ते डिझाइन मार्गदर्शक तत्त्वांपेक्षा जास्त आहेत आणि अपघाताचा धोका वाढतो. शहरी भागात आदर्श वेगमर्यादा 30-40 किमी/ता असावी.

या अहवालातून स्पष्ट होते की, नागपूर शहरातील काही रस्त्यांमध्ये सकारात्मक बदल होत आहेत, तर काही भागांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. हा अहवाल नागपूरच्या "लोक-केंद्रित व चालण्या योग्य शहर" बनण्याच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. नागपूर महानगरपालिका आता सुरक्षित, आरोग्यदायी, समतामूल्य रस्त्यांच्या निर्मितीसाठी प्रयत्नात अधिक व्यापक विस्तार करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

## कुख्यात गुन्हेगार मयूर पटलेला एमआयडीसी पोलिसांनी केले स्थानबद्ध

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ७ :

एमपीडिए कायद्या अंतर्गत सराईत व धोकादायक गुन्हेगार मयूर संतोष पटलेला एमआयडीसी पोलिसांनी स्थानबद्ध केले. पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांवर (एम.पी.डी.ए.)कायद्यांतर्गत कारवाई करणे बाबत मार्गदर्शन व सूचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे



एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे हद्दीतील रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार मयूर संतोष पटले, वय २१ वर्षे राहणार जुना निलडोह वार्ड नंबर ४, बबलू किराणा दुकाना मागे, एम आय डी.सी. नागपूर याच्या विरुद्ध खुन करणे, जबरी चोरी, चोरी मारपीट करून दुखापत करणे, शिवीगाळ करून लोकांना धमकी देणे, अवैद्यरित्या हत्यार बाळगणे यासारखे गंभीर स्वरूपाचे ७ गुन्हे दाखल होते. त्याच्याविरुद्ध यापूर्वी आवश्यक ती प्रतिबंधक कारवाई करून देखील त्याच्या वर्तणुकीत सुधारणा झालेली नव्हती. त्याचे गुन्हेगारी वृत्तीमुळे परिसरामध्ये दहशत निर्माण झाली होती. त्यामुळे सदर आरोपी विरुद्ध माननीय पोलीस उपायुक्त परिमंडळ - १, सहा. पोलीस आयुकक्त, एम.आय.डी.सी. विभाग, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग व सह पोलीस आयुक्त यांचं मार्फत पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांना सदर आरोपीस एमपीडिए कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. पोलीस आयुक्तांनी नमूद आरोपीस एमपीडिए कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबत आज रोजी आदेश पारित केल्यानंतर आरोपी मयूर पटलेला ठाणेदार गोकुल महाजन यांच्या मार्गदर्शनात सहा पोलीस निरीक्षक संजय बन्सोड व स्टाफ ने ताब्यात घेऊन आज नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे स्थानबद्ध करण्यात आले

## हेल्मेट न घालणे वाहन चोराला भोवले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :

विना हेल्मेट तो वाहन चालवित होता. वाहतूक पोलिसांनी विचारपूस केली असता तो पळ्ला. चौकशीत वाहन चोरीचे असल्याचे निष्पन्न झाले. ते वाहन धंतोली पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले. ही कारवाई एमआयडीसी वाहतूक झोनच्या पथकाने केली.

मिळालेल्या माहितीनुसार, एमआयडीसी वाहतूक झोनचे पोलिस हवलदार विजय मिश्रा आणि पोलिस शिपाई रामेश्वर तरडे हे लोकमान्यनगर मेट्रो स्टेशन येथे कर्तव्यावर हजर होते. या दरम्यान एक संशयास्पद व्यक्ती विना हेल्मेट दुचाकीने जाताना दिसला. पोलिसांनी त्याला थांबवून वाहनाची कागदपत्रे मागितली असता तो वाहन तेथेच सोडून पळाला. पोलिसांनी गाडीच्या नंबरवरून मालकाचा शोध घेतला. त्याच्याशी संपर्क केला असता माहिती मिळाली की, ते वाहन 4 जुलै 2025 रोजी चोरीला गेले होते. त्याची तक्रारही धंतोली ठाण्यात करण्यात आली आहे. मिश्रा आणि तरडे यांनी याबाबत नियंत्रण कक्षाला माहिती दिली. धंतोली पोलिस लोकमान्यनगर मेट्रो स्टेशन परिसरात पोहोचले. दोघांनीही ते वाहन त्यांच्या स्वाधिन केले.

## अवैध दारूभट्टीवर पोलिसांची धाड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

गुन्हे शाखा युनिट 1च्या पथकाने हिंगणा ठाण्यांतर्गत सुरू असलेल्या अवैध दारू भट्टीवर धाड टाकली. 125 लीटर मोहाची दारू जप्त करण्यासोबतच पोलिसांनी मोठ्या प्रमाणात सडवा नष्ट केला. या प्रकरणात पोलिसांनी 4 आरोपींना अटक केली आहे. दीपक राम पवार (40), अनिता अंबादास पवार (33) दोन्ही रा. चंद्रपूर रिठी, हिंगणा, नीकेश अशोक बावणे (32) आणि राजेश महादेव बावणे (36) दोन्ही रा. व्याहाडपेठ, हिंगणा अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. हिंगणा ठाण्यांतर्गत चंद्रपूर रिठीच्या पारधी वस्तीत काही लोक एका शेतात शेडमध्ये अवैधरित्या भट्टी लावून दारू बनवत असल्याची माहिती हिंगणा पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी रविवारी सकाळी पारधी वस्तीत धाड टाकली. एका झोपड्यात दीपक आणि अनिता भट्टी लावून मोहाची दारू बनवताना आढळले. तर नीकेश आणि राजेश दुचाकीवरून दारू नेण्याच्या तयारीत होते. पोलिसांनी चौघांनाही अटक केली. दारू तयार करण्यासाठी ठेवलेला 1000 लीटर मोहाचा सडवा पोलिसांनी घटना स्थळावरच नष्ट केला. आरोपींकडून दारू बनविण्याचे साहित्य, मोटारसायकल आणि इतर साहित्यासह एकूण 1 लाख 98 हजार रुपये किंमतीचा माल जप्त करण्यात आला.

## अथांग बागडेच्या नेतृत्वात
### एक्ससाईट प्ले टर्फ वर इतिहास रचला
### यंग डायमंड फुटबॉल लीग टुर्नामेंट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

जल्लोष आणि उत्साहाने भरलेल्या एका रोमांचक अंतिम सामन्यात भवन्स सिव्हिल लाईन्स शाखेचा विद्यार्थी अथांग प्रवीण बागडेने आज नागपूरमधील एक्ससाईट प्ले टर्फ ग्राउंड, के.टी. नगर येथे झालेल्या यंग डायमंड फुटबॉल लीगमध्ये डीडीएसवायएस टीमला गौरवशाली विजय मिळवून देऊन इतिहासात आपले नाव कोरले.

हा ऐतिहासिक विजय क्लबच्या वारशात पहिल्यांदाच घडला आहे जेव्हा संघ पहिल्यांदाच कर्णधार अथांग बागडेच्या नेतृत्वाखाली अंतिम फेरीत पोहोचून विजेतेपद मिळविले. अभिमानी पालक, उत्साही चाहते आणि तरुण प्रतिभेचा आनंद साजरा करणाऱ्या जल्लोषात एक्ससाईट प्लेमधील वातावरण उत्साहवर्धक होते.

शाळेच्या खेळाच्या मैदानापासून ते स्पर्धेतील यशापर्यंतचा अथांगचा प्रवास समर्पण, टीमवर्क आणि विश्वासाने काय साध्य करता येते याचे एक ज्वलंत उदाहरण आहे. वयापेक्षा जास्त प्रतिभा आणि हृदयात आग असल्याने, येत्या हंगामात हा तरुण फुटबॉलपटू निःसंशयपणे लक्ष ठेवण्याजोगा आहे. त्याने या प्रतिष्ठित युवा स्पर्धेत प्रथमच आपल्या संघाचे नेतृत्व केले, प्रशिक्षक राहुल बांते आणि रोहित सौदागर यांच्या अनुभवी मार्गदर्शनाखाली अपवादात्मक नेतृत्व, लवचिकता आणि रणनीतिक कौशल्य दाखवून, त्याने केवळ त्याच्या सहकाऱ्यांना प्रेरणा दिलीच नाही तर शहरातील युवा फुटबॉलच्या भावनेची पुनर्परिभाषा देखील केली.




अंतिम फेरीत संकल्प एसएफ संघाचा सामना करताना, डीडीएसवायएस संघाने तीव्रता आणि शिस्तीने भरलेले प्रदर्शन केले आणि अखेर हा प्रतिष्ठित चषक जिंकला. त्याने त्याचे सर्व श्रेय त्याचे पालक, त्याचा मोठा भाऊ आणि खेळाडू अथर्व, प्रशिक्षक राहुल बांते, रोहित सौदागर आणि संघातील खेळाडूंना दिले.

## रिझर्व्ह बँक हलबा कर्मचारी संस्थेतर्फे नोटबुक व शालेय साहित्य वितरण

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ७ :

रिजर्व बँक हलबा कर्मचारी संस्थे तर्फे नोटबुक व शालेय साहित्य वितरण कार्यक्रम रविवारी ६ जुलै रोजी संत कबीर हायस्कूल, राष्ट्रसेवा विद्यालय व कोलबा स्वामी उच्च प्राथमिक शाळा या तिन्ही शाळेचे संयुक्तपणे संत कबीर हायस्कूलच्या सभागृहात, नाईक तलाव, बांग्लादेश, नागपूर येथे राजकुमार डेकाटे यांच्या अध्यक्षात संपन्न झाला.




कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे विश्वनाथ आसई, संयोजक आदिवासी संघर्ष समिती, रवी पराते अध्यक्ष मध्य नागपूर, राष्ट्रवादी कॉंग्रेस, अर्चना गजभीये, मुख्याध्यापीका, राष्ट्रसेवा विध्यालय, लालगंज, नागपूर तसेच आरती गोखले, मुख्याध्यापीका, संत कबीर हायस्कूल यांचे शुभहस्ते नोटबुक व शालेय साहित्य वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्तावीक संस्थेचे सचिव भास्कर चिचघरे यांनी केले. प्रास्तावीका मध्ये संस्थेच्या कायार्ची माहिती संविस्तरपणे सचिवांनी दिली. कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुण्यांनी संस्थेद्वारे समाजातील गरीब होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणीक साहित्य वितरण करून समाजाच्या गरीब विध्यार्थ्यांना मदत करणे हे फार मोलाचे कार्य आहे. शिक्षणामुळे समाज प्रगत होऊन देशाच्या प्रगतीमध्ये सुध्दा मदत होत असते. संस्थे द्वारे अश्या प्रकारचे कार्यक्रम निःस्वार्थपणे राबवीत असतात याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे. असे पाहुण्यांनी आपले मत व्यक्त केले. नोटबुक व शालेय साहित्य वितरण वर्ग 5 वी ते 10 वी च्या 100 (शंभर) विध्यार्थ्यांना करण्यात आले. पाहुण्यांनी विध्यार्थ्यांना पुढील शैक्षणीक प्रगतीसाठी आशीर्वाद दिले. नोटबुक व शालेय साहित्य वितरण कार्यक्रमाचे संचालन मनोहर बारापात्रे यांनी तर आभार हेमराज चांदेकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पदाधिकारी व सदस्यांनी अथक परिश्रम केले.

# महासागर प्रभाग वार्ता

## नालीचे काम पूर्ण करण्याची मागणी

● प्रभू गजभिये
नागपूर, दि. ७

प्रभाग क्रमांक २ इंदोरा, रिपब्लिकननगर येथील श्रावस्ती बुद्ध विहारासमोर पाणी पुरवठ्याच्या कामासाठी खोदलेली नाली पूर्णपणे न बुजविता तशीच सोडल्याने लोकांना बराच त्रास सहन करावा लागतो.

काही दिवसांपूर्वी जलप्रदाय विभागाने श्रावस्ती बुद्ध विहारासमोर पाणी पुरवठ्याच्या कामासाठी खोदकाम केले होते. मात्र, काम झाल्यानंतर ती नाली पुर्ववत बुजविल्या गेली नाही. शिवाय त्यावर सिमेंटीकरण देखील केले नाही. पावसाच्या पाण्यामुळे या नालीतील माती वाहून गेल्याने तेथे खड्डा पडला आहे.

नालीत पावसाचे पाणी साचत असल्याने डासांची पैदास वाढली आहे. राजेंद्र धारगावे यांच्या घराच्या दारासमोरच खोदकाम केल्याने घरातील लहान मुले आणि वृद्ध नालीत पडण्याची भिती आहे. वाहनचालकांना रस्त्याने वाहन चालविता येत नाही. संबंधित विभागाकडे तक्रार करून सुद्धा ढिम्म अधिकारी लक्ष देत नाहीत.



नालीचे अर्धवट काम

तरी जलप्रदाय विभागाने नाली बुजवून त्यावर सिमेंटीकरण करण्यात यावे अशी मागणी या परिसरातील लोकांनी केली आहे.

## क्रिडा मैदानातील अतिक्रमण हटवा



*क्रिडा मैदानातील अतिक्रमण*

● संजय जवादे
नागपूर, दि. ७

राकेश ले आऊट क्र. ४ येथे असलेल्या क्रिडा मैदानावर काही लोकांनी अतिक्रमण करुन मैदान गिळंकृत केले आहे.

राकेश ले आऊट, साईनगरी येथे मुलांना खेळण्यासाठी भूखंड आरक्षित ठेवण्यात आला होता. त्यानंतर तेथे क्रिडा मैदान तयार करण्यात आले. मात्र, काही दिवसांनी या मैदानावर लोकांनी अतिक्रमण केले. त्यामुळे मुलांना खेळता येत नाही. काही मुले मैदानात क्रिकेट खेळायला जातात. खेळताना चेंडू कुणाच्या घराला लागल्यास मैदान गिळंकृत करणारे लोक भांडायला येतात. भितीपोटी मुले मैदानात खेळायला जात नाही.

याप्रकरणी नगर पंचायतचे प्रशासकीय अधिकारी नंदनवार यांना अनेकदा निवेदने दिली. प्रत्येक वेळी ते आश्वासन देतात. परंतु, अतिक्रमण काढत नाही. त्यामुळे अतिक्रमण करणाऱ्या लोकांसोबत प्रशासनातील अधिकाऱ्यांचे काही हितसंबंध आहेत काय? असा प्रश्न निर्माण होतो.

## इंदोरा मैदान अतिक्रमणाच्या विळख्यात





● प्रमोद जांभुळकर
नागपूर, दि. ७

विविध राजकीय पक्षांचे आंदोलन, सामजिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि अनेक कार्यक्रमाचे साक्षी असलेले उत्तर नागपुरातील प्रभाग क्र. ७ मधील इंदोरा मैदान आज अतिक्रमणाच्या विळख्यात सापडले असून या मैदानातील अतिक्रमण काढून कधी सौंदर्यीकरण होणार याकडे या परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

इंदोरा मैदान हे आंदोलनाचे ठिकाण म्हणून ओळखल्या जाते. कुठे मोर्चा काढायचा असेल तर आंदोलक याच मैदानात गोळा होतात. तेथूनच आंदोलनाची पुढील दिशा ठरते. याशिवाय विविध पक्षांच्या सभा याच ठिकाणी होतात. सोबतच सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा, मेळावे याठिकाणी होत असतात. जवळपास बाराही महिने या मैदानात विविध उपक्रम राबविल्या जातात. मात्र, मागील काही वर्षांपासून या मैदानातला विभत्स स्वरुप आले आहे.

काही लोकांनी चक्क या मैदानावर अतिक्रमण करून आपली दुकाने थाटली आहेत.

काहींनी तर चक्क या मैदानाला कचरा घर बनविले आहे. परिसरातील लोक या मैदानात कचरा आणून टाकतात. त्यामुळे जागोजागी कचऱ्याचे ढिगारे तयार झाले आहेत. सायंकाळच्या वेळी काही मद्यपी याच ठिकाणी आपल्या मैफिली सजवितात.

सोबतच चकन्याची दुकाने सुद्धा आहेत. मैदानाला संरक्षित भिंत नसल्याने बेवारस जनावरांचा वावर असतो. परिसरातील लोकांच्या सोयीसाठी मैदानात वॉकिंग ट्रॅक आणि ग्रीन जिम आहे.

मात्र, काही लोक दुकानाचा आडोसा घेत तेथे लघुशंका करतात. त्यामुळे मैदानात दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे मैदानात कुणीही सकाळच्या वेळी फिरायला येत नाहीत. सोबतच असामाजिक तत्वांच्या लोकांचा सुद्धा या मैदानात वर्दळ असते.

**इंदोरा मैदानातील अतिक्रमण आणि मैदानातील कचऱ्याचा ढिगारा**

रात्रीच्या वेळी या मैदानात असामाजिक तत्वांचा संचार असतो. काही मद्यपी दारू पित बसतात. त्यामुळे कधीही मोठी घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही असे विक्की डोंगरे यांनी सांगितले.

इंदोरा मैदानाची अतिशय दयनिय अवस्था झाली असून ऐकेकाळी आंदोलनाचे प्रेरणास्थान असलेले इंदोरा मैदान हेच का? असा प्रश्न अनेकांना पडतो. लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षपणामुळे या मैदानाची दयनिय अवस्था झाल्याचे या परिसरातील लोक सांगतात. तरी प्रशासनाने या मैदानाकडे गांभिर्याने लक्ष देवून मैदानाचे सुशोभीकरण करण्यात यावे अशी मागणी रवींद्र जनबंधू, प्रमोद लोखंडे, सत्यजीत लांजेवार, अतिम नेवारे यांनी केली आहे.



मैदानाला लागून फुटपाथवर काही दुकानदारांनी अतिक्रमण केले आहे. फुटपाथवरच मटनाची दुकाने, पान टपऱ्या, चपलांची दुकाने आणि राण्या रोट्यांची दुकाने आहेत. सायंकाळच्या वेळी या दुकानात बरीच गर्दी असते. रस्त्याने जाताना महिलांना खूप त्रास सहन करावा लागतो.
**राखी मानवटकर**



या मैदानाचे सौंदर्यीकरण करण्यात यावे यासाठी अनेकदा संबंधितांना निवेदने दिली. परंतु, संबंधित अधिकाऱ्यांनी या निवेदनांना करच्याची टोपली दाखविली. शिवाय लोकप्रतिनिधी लक्ष देत नसल्याने या मैदानाची ही अवस्था झाली आहे.
**आनंद साखरे**



परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी प्रशासनाने या मैदानात वॉकिंग ट्रॅक आणि ग्रिन जीम तयार केले होते. मैदानातील घाणीमुळे चालणे तर, सोडा व्यायाम देखील करणे कठीण झाले आहे. त्याचप्रमाणे व्यायाम करण्यासाठी लावण्यात आलेले साहित्य देखील अपुरे आहे.
**अमोल गजभिये.**

## गडर लाईन फुटल्याने घाण पाणी रस्त्यावर

● प्रदीप पौनीकर
नागपूर, दि. ७

प्रभाग क्र. २० नाईकवाडी पोलिस चौकीजवळील जीर्ण झालेली गडर फुटल्याने सांडपाणी रस्त्यावर वाहते. त्यामुळे परिसरातील लोकांना अतोनात त्रास सहन करावा लागतो.



५० वर्षे जुनी ही गडर लाईन आहे. अतिशय जुनी गडर लाईन असल्याने जागोजागी ती जर्जर झाली आहे. काही ठिकाणी गडर लाईन फुटली असून त्यातील घाण पाणी वस्तीत आणि रस्त्यावर वाहते. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत. घाण पाणी वस्तीत वहात असल्याने आरोग्याचा धोका निर्माण झाला आहे.

यासंदर्भात आम आदमी पार्टीच्या वतीने सतरंजीपुरा झोनचे सहायक आयुक्त धनंजय जाधव यांना निवेदन दिले आणि ही समस्या कायमस्वरुपी दूर करण्याची मागणी केली. यावेळी चेतन निळारे, विजय धकाते, मिथुन निमजे, पंकज धकाते, श्रावण हेडाऊ, आशिष नूिवे, सुखदेव हेडाऊ, पुरुषोत्तम बोकडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.